**CNR No :- MHSI100005352015**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. १९/२०२१ :–

## –: निशाणी २५ वरील आदेश :–

वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्यात व दावा नोंदवहीमध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी केला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादीने असे कथन केले आहे की, सदरचा दावा दि.१७.०१.२००८ रोजी प्रतिवादी क्र. ४ ने प्रतिवादी क्र. १ ला करुन दिलेले तथाकथीत हक्कसोडपत्रक व्यर्थ व निरर्थक आहे असा ठराव होणेसाठी व कायमच्या ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. सदरचा दावा दाखल करताना टंकलेखनातील चुकीमुळे काही तांत्रीक चुका झाल्याने दाव्यात दुरुस्ती करणे अपरीहार्य झाले आहे. सबब वादी खालीलप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मागत आहे.

दाव्याच्या परीच्छेद क्र. १ मधील अनु. क्र. ५ ची मिळकत ''स.नं.१३९, हि.नं. ०'' असे नमुद केले आहे. त्याठिकाणी स.नं. १३९ हे अंक तसेच ठेवुन हि.नं. ० च्या पुढे किंवा १ असा अंक लिहून होणारी दुरुस्ती ''स.नं.१३९, हि.नं. ० किंवा १'', दाव्याच्या परीच्छेद क्र. ९ मधील ५ व्या ओळीमध्ये ''दिनांक १७/०१/२०२१'' रोजी असे नमुद केले गेले आहे त्याठिकाणी ''दिनांक १७/०१/२००८'' अशी दुरुस्ती, दाव्याच्या परीच्छेद क्र. २३ मधील अ क्लॉजमध्ये २ऱ्या ओळीत ''हक्कसोडपत्रक''शब्दाच्या आधी ''तथाकथित'' हा शब्द लिहुन ''तथाकथित

हक्कसोडपत्रक'' अशी दुरुस्ती करणेस परवानगी मागितलेली आहे. वादीने पुढे असे कथन केले आहे की, सदरच्या दुरुस्त्या तांत्रीक स्वरुपाच्या असून त्यामुळे दाव्याच्या गुणदोषात कोणताही बदल होणारा नाही. सदरची चुक टंकलेखनातील चुकीमुळे झालेली असून जाणुन बुजुन केलेली नाही. न्यायाच्या पुर्ण पुर्ततेसाठी सदरची दुरुस्ती करण्यास परवानगी न दिल्यास वादीचे पैशाच्या स्वरुपात भरुन न येणारे असे नुकसान होणारे आहे व वादींना त्यांच्या न्यायहक्कांस मुकावे लागणारे आहे. सबब वादीस मागणीप्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज केलेला आहे.

०३. अर्जाच्या अनुषंगाने प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी क्र. १ यांनी अर्जाच्या पाठीमागे म्हणणे सादर करुन अर्जास तीव्र आक्षेप नोंदविलेला आहे. प्रतिवादी क्र. १ च्या म्हणण्यानुसार वादीचा अर्ज खोटा व खोडसाळ आहे. वादीला अर्जाच्या परीच्छेद मध्ये कोणतीही दुरुस्ती करावयाची आहे हे स्पष्टपणे नमुद केलेले नाही तसेच समर्पक कारण दिलेले नाही. सदरची दुरुस्ती केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये फार मोठा बदल होणारा आहे व तो प्रतिवादी यांचेवर अन्याय करणारा आहे. तसेच अर्जाच्या तिसऱ्या परीच्छेदमधील मागितलेली दुरुस्ती वादीस करता येणारी नाही, सबब सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती प्रतिवादी क्र. १ यांनी केली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. वादीने दाव्याच्या परीच्छेद क्र. १ मधील अनु. क्र. ५ ची मिळकत ''स.नं.१३९, हि.नं. ०'' ऐवजी ''**स.नं.१३९, हि.नं. ० किंवा १**'', दाव्याच्या परीच्छेद क्र. ९ मधील ५ व्या ओळीमध्ये ''दिनांक १७/०१/२०२१'' ऐवजी ''**दिनांक १७/०१/२००८**'' व दाव्याच्या परीच्छेद क्र. २३ मधील अ क्लॉजमध्ये २ऱ्या ओळीत ''हक्कसोडपत्रक'' ऐवजी ''**तथाकथित हक्कसोडपत्रक**'' अशा तीन दुरुस्त्या दाव्यात करणेस परवानगी मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज केलेला आहे. दावा दि.२०.०७.२०२१ मध्ये दाखल करण्यात आलेला आहे. वादी सदरची दुरुस्ती दि.१७.०५.२०२२ रोजी प्रस्तुत अर्जाद्वारे मागत आहे. वादीच्या या कृत्यामुळे प्रतिवादीचा व परीणामी न्यायालयाचा अमुल्य वेळ वाया गेलेला आहे. असे असता वादीचा अर्ज नामंजुर झाल्यास वादीस या अर्जाच्या अनुषंगाने विविध कायदेशीर कामे चालविणे भाग पडेल व ते नैसर्गिक न्यायतत्वाच्या विरुद्ध होणारे आहे. त्यामुळे वादीवर खर्चाचा आदेश पारीत करुन न्यायाच्या कारणे अर्ज मंजूर करणे मला उचित वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**–:: आदेश ::–**

१. रक्कम रु. ५००/–(रुपये पाचशे मात्र) खर्चाचे आदेश करुन अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने खर्चाच्या रक्कमेपैकी रक्कम रु. ३००/– (रुपये तीनशे मात्र) ही प्रतिवादीस आदा करावी.

३. उर्वरीत रक्कम रु. २००/– (रुपये दोनशे मात्र) ही मोफत विधी सेवा प्राधिकरण (Free Legal Aid) येथे जमा करावी.

४. वादीस असे आदेशीत करण्यात येते की, वादीने खर्चाची रक्कम रु. ५००/– (रुपये पाचशे मात्र) सदर आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत कसुरीशिवाय भरुन दाव्यात मागणीप्रमाणे योग्य ती दुरुस्ती करुन दावा दुरुस्त प्रत हजर करावयाची आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by YASHODHAN PRADIP BAVKAR
Date: 2023.03.17 17:03:40 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)

दिनांक – १६.०३.२०२३ दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर)

दोडामार्ग.